राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/बदल्या/२०२०/ 1765 दिनांक : 11 JUN 2020

प्रति,

उपसचिव / संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

**विषय : विभागीय बदली मिळणेबाबत..**

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/समावेशन/२०१९/३२५१,
दिनांक ०६/०८/२०१९.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपल्या संस्था / कार्यालयाची गट क व ड मधील शासकीय कर्मचा-यांची माहे एप्रिल / मे २०२० मध्ये प्रस्तावित नियतकालिक बदल्यांबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह मागविण्यात आलेली होती. त्यानुसार अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे वगळता अन्य सर्व संस्था / कार्यालयांची बदल्यांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

तथापि ब-याच संस्थांनी सदर प्रस्तावासोबत विभागीय बदलीसाठीचे अर्जही या कार्यालयास सादर केले आहेत.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२, दिनांक १५ मे, २०१९ मधील मुद्दा क्रमांक ९ नुसार शासकीय कर्मचा-यास ज्या ठिकाणी समावेशनाने कायम स्वरुपी जाण्याची इच्छा आहे, त्याने त्या ठिकाणी असणा-या शासकीय कार्यालयाकडून सरळसेवेच्या / पदोन्नतीच्या रिक्त पदांची प्रवर्ग निहाय माहिती प्राप्त करुन त्यानंतर त्याच्या नियुक्ती प्राधिका-याकडे कोणत्या अपवादात्मक वैयक्तिक कारणास्तव कायम स्वरुपी समावेशन करणे आवश्यक आहे, त्याबाबतच्या पुराव्यासह विनंती अर्ज करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.

**सबब वर नमूद केल्यानुसार अर्ज करणेबाबत संबंधित कर्मचा-यास कळविणे. तसेच यापूर्वी या कार्यालयास सादर केलेले विभागीय बदलीचे अर्ज दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचेही संबंधितांना कळविणे.**

(डॉ. दि. रा. नंदनवार),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरिता रवाना.
(२) संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांना कळविण्यात येते की, फक्त आपल्याच संस्थेची बदल्यांची माहिती या कार्यालयास अप्राप्त असल्याने सदरची माहिती मुख्य कार्यालयास सादर करता येत नाही., तरी बदल्यांची माहिती त्वरित या कार्यालयास सादर करावी.

E:\my documents\Samaveshan 15-05-2019.docx\61